**प्रेस नोट**

**दिनांक– ०२/१२/२०२२**

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | ईलोसे प्रकाश कळणु धांडे, वय–५६ वर्ष, व्यवसाय–पोलीस पाटील खडकी सदार रा.खडकी सदार ता.रिसोड जि.वाशिम |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक ०२/१२/२०२२ रोजी १३.५१ वा. ते १४.३५ वा पावेतो. |
| ४ | लाच मागणी केलेली रक्कम | २०,०००/–रु. |
| ५ | लाच स्विकार केलेली रक्कम | ९०००/– रु. |
| ६ | घटनास्थळ | पोलीस स्टेशन रिसोड जि.वाशिम |

यातील तक्रारदार यांच्या विनंती वरुन दि.०१/१२/२०२२ रोजी ग्राम देगाव येथील देवी मंदिरात जावून तक्रार नोंदवून घेतली की, तक्रारदार यांच्या मुला विरुध्द पोलीस स्टेशन रिसोड येथे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयामध्ये कोर्टतून जमीन मिळवुन देणे कामी कोर्टात पोलीस स्टेशन येथून कागदपत्रे लवकरात लवकर पाठविणे कामी लोकसेवक हे २०,०००/–रू लाचेची मागणी करत असल्याबाबत तक्रार दिली.

सदर तक्रारीची दि.०१/१२/२०२२ रोजी शासकिय पंचासमक्ष पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान तक्रारदार व ईलोसे पोलीस पाटील प्रकाश धांडे त्यांची भेट होवुन ईलोसे धांडे यांनी २०,०००/–रु. लाच रक्कमची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार हे पोलीस सलीम रेघीवाले यांना पोलीस स्टेशन रिसोड येथे जावुन भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना पैशाची मागणी केली नाही.

दिनांक ०१/१२/२०२२ रोजी सापळा कारवाई शासकीय पंचा समक्ष करण्यात आली असता इतर लोकसेवक आरोपी पोलीस पाटिल प्रकाश धांडे यांनी तक्रारदार यांना लोणी फाटा येथे बोलावून तडजोडी अंती ९,००० रुपये स्विकारण्याची तयारी दर्शवली परंतु रक्कम न स्विकारता इलोसे हॆ एकटाच दुचाकीने गावी निघुन गेला.

दिनांक ०२/१२/२०२२ रोजी सापळा कारवाई शासकीय पंचासमक्ष करण्यात आली असता तक्रारदार यांनी इलोसे पोलीस पाटिल प्रकाश धांडे यांच्याशी भेट घेवुन कामा संबंधी बोलणी करुन ठरल्याप्रमाणे तक्रारदार यांच्या मुलाची जामीन करुन देण्यासाठी कोर्टात कागदपत्रे लवकरात लवकर पोस्टे रिसोड येथुन पाठविणे कामी ९,००० रु लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्वत: स्विकारल्याने इतर आरोपी लोकसेवक प्रकाश कळणु धांडे, पोलीस पाटिल ग्राम खडकी सदार ता.रिसोड जिल्हा वाशिम यांना रंगेहात पकडुन ताब्यात घेण्यात आले असुन आरोपी विरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.मारुती जगताप सा., मा.अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.अरूण सांवत सा., श्री.देविदास घेवारे सा., घटक प्रमुख मा.पोलीस उपअधिक्ष श्री गजानन आर शेळके सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. महेश भोसले,पोलीस निरीक्षक एस.यु.कांबळे पोलीस अंमलदार पोहवा विनोद मारकंडे, नितीन टवलारकर, आसीफ शेख, राहुल व्यवहारे, पोलीस नाईक योगेश खोटे, रवी घरत व चालक शेख नावेद सर्व ला.प्र.वि.वाशिम यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

मोबाईल क्र. – ऑफीस फोन नं.:–०७२५२–२३५९३३,
टोल फ्रि नंबर –१०६४.

P.I

(महेश भोसले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.

पोलीस उपअधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो वाशिम